# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पकटीकरण रविवार – ०२ जानेवारी २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

**धर्मगुरू** ः माझ्या बंधू भगिनींनो, ह्या दिवसात आमच्या तारणा-या परमेश्वराची दया आणि प्रेम आम्हामध्ये प्रकट झाले आहे. आपल्या स्वतःच्या सत्कृत्यांवर नव्हे तर अखिल मानवजातीवरील त्याच्या प्रेमावर विश्वास ठेऊन आपण आपल्या प्रार्थना परमेश्वराला अर्पण करू या.

**प्रतिसाद** ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूची सुवार्ता जगभर घोषित करण्यासाठी कृपा आणि चांगल्या आरोग्याची देणगी मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी ह्या नवीन वर्षात आपल्या देशात सर्व धर्म स्नेहभाव व बंधुत्वाची भावना वाढीस लागण्यासाठी प्रयत्न करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. ज्ञानी पुरूषांनी ज्या आंतरिक प्रेरणेने व कुतूहलाने ख्रिस्ताचा शोध घेतला तशाच आंतरिक प्रेरणेने आपल्यालादेखील खिस्ताचा शोध घेता यावा यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वर अनेक मार्गाने आपल्याला प्रकट होत असतो व आपले जीवन सर्वस्वी बदलून टाकत असतो. ख्रिस्ताच्या प्रकटीकरणाद्वारे आपले जीवन अधिक श्रद्धावंत बनावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोनो विषाणूपासून व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उदया/आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू** ः हे प्रभो परमेश्वरा, प्रेमाने आणि आपले कौमार्य न गमावता मरियेने आमचा प्रभू आणि तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला जन्म दिला. तिला आमच्या प्रार्थना तुझ्यासमोर सादर करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.